# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०३/२०२४ (सोमवार) दुपार**

---

## अवैधरीत्या घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे खापरखेडा अंतर्गत मौजा नांदा शिवार जवळ दि. १७/०३/२०२४ चे १२.३५ वा. ते १३.५५ वा. दरम्यान यातील आरोपी नामे– १) भुपेश उर्फ बंटी गुलाबसिंग परमार वय वर्ष रा. वार्ड क ०२ धौनीकर गल्ली खापरखेडा ह. जैन वार्ड मोजा चिचगड तह देवरी रा. जिल्हा गोंदीया हा खापरखेडा येथील नांदा शिवारातील भवन्स शाळे जवळ खापरखेडा येथे कोणत्यातरी हस्तक्षेपणीय गुन्हा करण्याचा उद्देशाने एक लोखंडी देसी कट्टा मॅगझीन सह (माउझर) सह कमरेत बाळगुन फिरत आहे. अशी विश्वसनीय खबर मुखबीर द्वारे मिळाल्याने मोक्यावर जावुन खापरखेडा पोलीसांनी आरोपीस ताब्यात घेवुन आरोपीची कायदेशिररित्या अंगझडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातुन एक माउझर (देसी कट्टा) किंमती ४०,०००/–रु व एक पितळी राउन्ड किंमती १०००/–रू. असा एकुण ४१,०००/– रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने आरोपीस ताब्यात घेवुन त्यास विचारपुस केले असता त्याने सांगितले की सदरची माउझर ही सुरज कन्हैयालाल कावडे, वय २३ वर्ष, वार्ड क्र. ०३ खापरखेडा याचे कडुन विकत घेतली आहे. फिर्यादीचे रिपोर्टवरून दोन्ही आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पोलीस हवालदार प्रफुल भिकुजी राठोड पोस्टे खापरखेडा यांचे रीपोर्ट वरून पोस्टे खापरखेडा येथे कलम ३/२५, ५/२५ भारतीय हत्यार कायदा १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद केला असुन यातील आरोपी क्र. १) यास अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक आरती नरोटे पोलीस स्टेशन खापरखेडा या करीत आहे.

## पो.स्टे. कोंढाळी हद्दीत जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक १७/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कोंढाळी येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन कोंढाळी हद्दीतील मौजा सालई शेत शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर पथकाने मौजा सालई शेत शिवार येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) अनिकेत सुर्यभान धोत्रे, वय २६ वर्ष रा. कोंढाळी २) पवन विनायक कोचे वय २३ वर्ष रा. कोंढाळी ३) पंकज देविदास बारंगे रा. सावळी ता. कारजा जि. वर्धा ४) नरेंद्र नारायण खंते, वय ३८ वर्ष रा. कोंढाळी ५) सुधाकर शेषरावजी चरडे, वय ४२ वर्ष रा. कोंढाळी ६) नंदकिशोर धर्णे वय ३२ वर्ष रा. कोंढाळी शनिचरापेठ ७) देवराव शेषराव परवत, वय ४६ वर्ष रा. कोंढाळी** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०७ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन पाच अॅन्ड्रॉइड फोन किंमती ४१,०००/—रू. व नगदी ३७,९००/— रू. व बावन तासपत्ते किंमती ५०/— रू असा एकुण ७८,९५०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे कोंढाळी येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री. बापु रोहम यांचे मार्गदर्शनात पोस्टे कोंढाळी येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक राजकुमार त्रिपाठी, पोलीस उपनिरीक्षक धवल देशमुख, पोलीस नायक नितीन लवटावार, भुषण मदनकर, पोलीस अंमलदार दुलसिंग आडे, वसंता नागरे, अच्युत गुट्टे यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**